“ अंधश्रध्दा बाधितांचा एक समाजशास्त्रीय अभ्यासः विशेष संदर्भ लातूर जिल्हा ”

“A Sociological study of people infested with Superstition : Special Reference to Latur District”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव विज्ञान विद्या शाखेतील पीएच.डी.(समाजशास्त्र) नोंदणीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा.

संशोधक

रत्नाकर वसंतराव नळेगावकर

(कनिष्ठ प्राध्यापक)

नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालय,किनगाव

ता.अहमदपूर जि.लातूर

मार्गदर्शक

डॉ.सतीश जी.ससाणे

(सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, समाजशास्त्र विभाग)

महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर जि.लातूर

प्रस्तावना :

प्रस्तूत संशोधन भारतातील समाजातील 'अंधश्रध्दा' या दृष्टिकोनातून केले जाणार आहे. भारतीय सर्व समाजात श्रध्दा ही बाब धर्मांशी निगडीत आहे. त्यामुळे मानवी जीवनात श्रध्देला महत्वाचे स्थान आहे. ही बाब पारंपरिक काळापासून अस्तिवात आहे. श्रध्दा हया प्रामुख्याने धर्म कार्याशी निगडीत आहेत. परंतू श्रध्दाचे रुपांतर आज मोठया स्वरूपात अंधश्रध्देत झाले आहे. आज याचे स्वरुप समाजात गंभीर रुप धारण करीत आहे. अंधश्रध्दा हे खरे तर विषवृक्षांचे एक घनदाट जगंल आहे. या जंगलाने समाजाचा फार मोठा भाग व्यापलेला आहे. या जंगलातील झाडा–झुडपांना विषारी सर्पानी विळरवे घातलेले आहेत. हे जगंल नेस्तनाबूत करणे ही अतिशय कठीण गोष्ठ आहे. या जगंलातील विषारी वृक्षांवर जिथे जिथे धाव घालाल तिथे तिथे विषारीच फुटवे फुटतील, पण घाव तर घातलेच पाहिजेत. फुटवेही छाटले पाहिजेत. फांधाही तोडल्या पाहिजेत्. हे झाड समूळ नष्ट झाल्याशिवाय हे जंगल जमीन दोस्त करता येणार नाही. यासाठी अनेक दशकेच जावे लागतील. हे विषारी जंगल पेटविण्याचे प्रयत्न अनेकांनी केलेला आहे. म. फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हे जंगल तोडण्याचे प्रयत्न केले. संत गाडगे बाबा लढले, आगरकरांनी बुध्दिवाद रुजविण्याचा प्रयत्न केला. हेच कार्य पुढे बाबा आढाव, डॉ.एन.डी.पाटील, डॉ.नरेंद्र दाभोळकर आदींनी चालवले. अंधश्रध्देवर केवळ शाब्दीक हल्ले करुन अंधश्रध्दा दूर होणार नाही. याकरिता लोकांना अंधश्रध्दा बनविणारी परिस्थिती बदलणे हा प्रभावी उपाय आहे. लोकांची असहाय्यता कमी झाल्याशिवाय अंधश्रध्देचा प्रभाव कमी होणार नाही.

आधुनिक समाजातील अंधश्रध्दा ही एक सामाजिक समस्या म्हणून पुढे आली आहे. अंधश्रध्देची पाळेमुळे अनेक शतकापासून समाजात खोलवर गेली आहेत व चोहोबाजूनी ती पसरली आहे. प्रकाशाचा अभाव म्हणजे अंधार. तव्दतच वैज्ञानिक दृष्टिचा अभाव म्हणजे अंधश्रध्दा. जी डोळस असते ती श्रध्दा आणि जी आंधळी असते ती अंधश्रध्दा. अंधश्रध्देने समाजाला खग्रास ग्रहणासारखे ग्रासलेले आहे. अंधश्रध्दा हा दैववादाचा स्त्रोत आहे्. तिच्या मागे स्वार्थ देखील लपलेला आहे आणि भयही दडलेले आहे. माणूस शुभ अशुभाच्या कल्पनामध्ये अडकलेला आहे. स्वर्ग – नरकाच्या कल्पनामध्ये तो अडकला आहे. बुध्दीवादी दृष्टिकोणातून माणसे विचार करीत नाहीत. आज विज्ञान तंत्रज्ञानाचा विकास प्रचंड प्रमाणात झालेला आहे,

पण त्याचा त्यांच्या विचार करण्याच्या पध्दतीवर व मानवसिकतेवर फारसा परिणाम झालेला दिसत नाही. कार्यकारण भावाचा तो स्वतःला स्पर्श होऊ देत नाही. तो चमत्कारावर विश्वास ठेवतो. इतकेच नव्हे तर नरबळी पशुबळी, देवदासी असे अधोरी कृत्य तो करतो. अशाच कृत्यांना तो धर्म मानतो, धर्माची ढाल पुढे करुन तो स्वतःच बचाव करतो.

धार्मिक श्रध्दा वेगळया व धर्माच्या आचरणाखाली लपलेल्या धार्मिक अंधश्रध्दा वेगळया. समाजाची धारणा करतो तो, धर्म माणसाला धर्म कर्तव्याची जाणीव करुन देतो. धर्माचा अर्थ कर्तव्य असाच आहे. प्रार्थना उपासनेच्या माध्यमातून माणूस स्वतःच्या जीवनाचे उन्नयन करतो. उदात्त जीवन मूल्यांवर तो उभा असतो. नैतिकता ही त्यांचा गाभा आहे. अंधश्रध्दा हया माणासाला अधर्माकडे खेचतात. अंधश्रध्देला दुर्देवाने धर्म आणि अध्यात्म मानण्यात आले. धार्मिक कल्पना हया बुध्दी व विवेकवादावर टिकल्या पाहिजेत. अध्यात्म हे विज्ञानाच्या निकषावर टिकले पाहिजे. अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे मिशन राहिले आहे. चळवळीचा अट्टाहासच हा आहे की, नुसत्या प्रबोधनाने व प्रात्यक्षिकांनी अंधश्रध्दा उरवडली जाणार नाही. याची त्यांना कल्पना होती. त्यासाठी कायदा करणे आवश्यक आहे. यासंबधाने चळवळीने प्रयत्न ही केल्याचे दिसून येते.

अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य अतिशय जटिल आणि गुंतागुंतीचे आहे. खरे तर ते अनेक पिढयांचे काम आहे. महाराष्ट्र पुरोगामी आहे असे आम्ही अभिमानाने सांगतो. तो फुले, शाहू , आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे असे आमचे पुरोगामी नेते सांगतात. पण त्यापैकी अनेक नेते मुहूर्त काढल्याशिवाय कामाची सुरुवात करीत नाहीत. चंद्रावर चंद्रयान–3 पोहोचले, पण पितृपक्षात मंगळ हा अनेकांच्या मार्गात आला. अंधश्रध्दा निर्मूलनाचा कायदा पास करणारेच अंधश्रध्देत अडकलेले आहेत. हा किती मोठा विरोधाभास आहे. शुभ–अशुभाच्या कल्पना किती खोलवर रुजल्या आहेत. लोकमाणसात अंधश्रध्दा खोलवर रुजलेली आहे. त्यामागे अज्ञाताबदलची गूढ अशी भीतीही आहे. अंधश्रध्दा ही माणसाला लुळीपांगळी बनवते. पांगुळगाडयावर आरुढ झालेला भारतीय समाज जागतिक स्पर्धेत टिकणार कसा.

भारतीय समाज भौगोलिक फरक आणि सामाजिक सांस्कृतिक वैशिष्टय अधारे अदिवासी समुदाय, ग्रामीण समुदाय व शहरी समुदाय अशा तीन विभागला आहे.

विविध भूमिका, समुह सामाजिक संकेत, रुढी परंपरा, सांस्कृतिक मूल्ये हे समाजाच्या संरचनेचे मुलघटक होत. सामाजिक विषमता भारताची ज्वलंत समस्या आहे. अशा सामाजिक विषमतेमुळे भारतीय समाज बऱ्याच सामाजिक समस्या पासून ग्रस्त आहे. जसे की लोकसंख्येत वाढ, बेरोजगार, अशिक्षा, दहशतवाद, भ्रष्टाचार, नशा, हुंडा, बालविवाह, भ्रूण हत्या, जीवघेणे रोग, घटस्फोट, अंध्दश्रृध्दा अशा विविध समस्या दिसून येतात. त्या पैकी एक विशेषत्वाने अंध्दश्रृध्दा ही पूर्वापार चालत आलेल्या रुढी आणि परंपरा यात भारीतय समाज बुडून गेलेला आहे. या बाबत डॉ. अनिल गांधी यांनी महाराष्ट्र टाइम्स मध्ये आपली भूमिका मांडली आहे ते म्हणतात, की मनुष्य हाच आपला धर्म आहे, अस असताना आपण सुखनैव का नांदू शकत नाही. कुठल्या देशात, कुठल्या गावात, किती आक्षांश किती रेखांशावर जन्म घ्यायचा कुणाच्या हातात नसते, आपला समाज त्याला ओळख देते. हे सारे अनाकलनीय आहे. यावर म्हणावा तसा उपाय होताना दिसत नाही. पिढयानपिडयाचे शतकानुशतके हे संस्कार आपल्याला सुधारु देत नाहीत. असेच म्हणाव लागेल. बहुतेक भारतीय आजही एका पूर्वापार चालत आलेल्या जुन्या समजुतीवर विश्वास ठेवतात. अशा अंध्दश्रृध्देतून बाहेर काढण्याचे प्रयत्न भारतात विशेष करुन महाराष्ट्रात अनेक कृतिशील सुधारकांनी केलेले दिसून येते.

अंध्दश्रध्दा या समाजाच्या, राष्ट्राच्या प्रगतीच्या विकासाच्या मार्गातील अडथळा आहेत, हे अडथळे दूर करण्याचे कार्य संतानी,समाज सुधारकांनी आयुष्यभर केले. अलिकडच्या काळात या अंधश्रृध्देच्या विरोधात संघर्ष करणाऱ्या विचारवंतात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचेही महत्वपुर्ण योगदान राहिले आहे अंध्दाश्रध्दा ही समस्या देश, धर्म, जाती जमाती पुरती मर्यादीत नाही, तिचे स्वरुप सार्वत्रिक आहे. याला कोणताही समूह अपवाद राहिलेला दिसून येत नाही. म्हणून संशोधनाच्या दृष्टिकोनातून लातूर जिल्हा निश्चित करण्यात आला आहे. हे प्रमाण तालुका निहाय, जात, धर्म, वयोगट, लिंग, राहण्याचे ठिकाण या वर्गवारीनुसार वेगवेगळे असले तरी त्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जाणार आहे.

<u>लातूर जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती</u> **(Geographical Situation of Latur District)**

महाराष्ट्र राज्यात मराठवाडा प्रादेशिक विभागात एकूण आठ जिल्हे आहेत. त्या पैकी आग्नेय महाराष्टात 7 हजार 372 चौ.किमी क्षेत्रफळ असलेला लातूर जिल्हा आहे. जिल्हयात लातूर, अहमदपूर, उदगीर, औसा, निलंगा, चाकूर, देवणी, जळकोट, शिरुर आनंतपाळ, रेणापूर या दहा

तालुक्याचा समावेश आहे. जिल्हयातील बहुतांश लोक ग्रामीण भागात रहात असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. भौगोलिक दृष्टया लातूर जिल्हा महाराष्ट्राच्या दक्षिण भागात आहे. जिल्हयाच्या अग्नेयला कर्नाटक राज्य आहे. लातूर जिल्हयाच्या सिमा लगत नांदेड, परभणी, बीड, उस्मानाबाद चार जिल्हे आहेत. अशा स्वरुपाची या जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती आहे.

अंध्दश्रध्दा म्हणजे काय ? (What is Superstition)

अंधश्रध्दा म्हणजे काय त्याची सर्वसंमत शास्त्रीय कायदेशीर व्याख्या करणे अवघड असले तरी अंधश्रध्दाचे वर्णन करता येते. एखादया अधश्रध्देबद्दल मतभेद होऊ शकतील पण यादीतील दहापैकी नऊ तरी अंधश्रध्दा या अंधश्रध्दाच आहेत याला सर्वसाधारण मान्यता मिळू शकेल. तसे पहाता अंधश्रध्दा भारतातील सर्वात वादग्रस्त विषय आहे. अंधश्रध्दा प्रसाराची सुरुवात धर्मापासून नाही तर मानवी मनापासून झाली. या अंधश्रध्देच्या विश्वासामुळे समाजातील लोकांच्या सामाजिक कल्याणावर नकारत्मक प्रभाव पडतो. एखाद्या परंपरागत चालत आलेल्या गोष्टीवर खात्री न करुन घेता, तर्क वितर्क बाजूला ठेवून अंधळेपणाने एखादी गोष्ट स्वीकारणे यास अंधश्रध्दा असे म्हणतात. अंधश्रध्दा म्हणजे एक मानसिक दुबळेपणा आहे.

भारतातील अंधश्रध्देची स्थिती (Situation of Superstition in india)

भारतातील लोकात अंधश्रध्देची बाधा विविध कारणांनी असल्याने परिस्थितीन्वये अंधश्रध्दा बाधित लोकांची संख्या वेगवेगळया राज्यात वेगवेगळया स्वरुपात असलेली दिसून येते. आजही अशिक्षित समाजात तुलनात्मक दृष्टिकोनातून अंधश्रध्दा बाधितांची संख्या अधिक असल्याचे आढळून येते. भारतातील परंपरागत चालीरिती नुसार कांही रुढी व इतर कांही प्रथा परंपरा आजही चालू आहेत. उदाहरणात नागपंचमी सणा दिवशी सापाला दुध पाजने जे की साप दुध पित नाही असे विज्ञान सांगते. अशा कांही घटना समाजामध्ये सातत्याने होतना दिसून येतात. त्याचे स्वरुप पुढील प्रमाणे दिसून येते. जसे की भूत, भानामती, चेटकीण, मंत्रतंत्र, चमत्कार, यज्ञयाग इत्यादीतून. महाराष्ट्र व मराठवाडयात अंधश्रध्दा बाधित लोकांचे अधिक प्रमाणात असेलेले आढळून आले आहे. मराठवाडयात बरीच भोंदूगिरी करणारे लोक असून दोरे, गंडे, ताईत देऊन आजार दुरुस्त करण्याचे सांगून अंधश्रध्दा बाधित लोकांची फसवणूक करण्याचे काम करतात.

संशोधन विषयाची निवड (Subject of research project)

महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हणून संबोधले गेले आहे. या राज्याला महान समाज सुधारकांचा वारसा लाभलेला आहे. अशा पुरोगामी राज्यात अलिकडच्या काळात अंधश्रध्देचे स्तोम मोठया प्रमाणात माजले आहे. याचा परिणाम सर्वसामान्य लोक या अधंश्रध्देला बळी पडत आहेत. यामुळे समााजाच्या विकासामध्ये मोठे अडथळे निर्माण होत आहे. अशा स्थितीत लातूर जिल्हयात अंधश्रध्देचे स्वरुप तपासून पाहणे आवश्यक वाटते.

समाजात अंधश्रध्देचे स्वरुप गंभीर रुपधारण करित आहे. तेव्हा असा प्रश्न पडतो की अंधश्रध्देत अडकलेल्या लोकांची कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती कशी आहे. त्यांच्या समस्या काय आहेत. जातीनिहाय अंधश्रध्देचे प्रणाम कसे आहे, त्याचा विचार होणे आवश्यक वाटते. तेंव्हा अशा पार्शवभूमीवर लातूर जिल्ह्याची स्थिती काय आहे. हे जाणून घेण्याची उत्सुकता झाली, या उत्सुकतेपोटी ग्रामीण समाजाची संरचना, कुटूंब, परंपरा रुढी, यांचा अभ्यास होइल. या सर्व घटकाचा अंधश्रध्देशी सहसंबंध काय आहे. हे जाणुन घेताना लातूर जिल्हयातील अंधश्रध्दाबाधीत लोकांची आर्थिक, समाजीक, धार्मिक स्थिती कशी आहे त्याचे प्रश्न व समस्या कोणत्या आहेत. हा चिंतनाचा वा संशोधनाचा विषय आहे. या समस्येच्या निराकरणासाठी यावर तपशिलात जाऊन अध्ययन व कारणाचा शोध घेऊन अभ्यासाअंती जर कांही विधायक सूचना करता आल्या तर योग्यच होइल हाच या संशोधनामागील मुख्य हेतू आहे. त्यासाठी संशोधन मर्यादीत व वस्तुनिष्ठ होण्यासाठी संशोधन विषय घेण्याचे ठरले. लातूर जिल्हायातील अंधश्रध्दा बाधीत लोकांचा समाजशास्त्रीय अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला. त्यासाठी संशोधनाच्या दृष्टिकोनातून कांही उदिष्टे निश्चित केले आहेत ते पुढील प्रमाणे

संशोधनाची उदिष्टे (Objective of the research project)

- अंधश्रध्देची संकल्पकात्मक मांडणी करणे.
- अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीची पार्श्वभूमी विशद करणे.
- लातूर जिल्हयातील अंधश्रध्दा बाधित लोकांचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे.
- अंधश्रध्दा बाधित लोकांच्या भूमिकेचे व दर्जाचे अध्ययन करणे.
- अंधश्रध्दा बाधितांच्या कौटूंबिक, सामजिक, आर्थिक, धार्मिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

- अंधश्रध्दा बाधितांच्या समस्या आणि त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक चलांशी असलेले सहसंबध अभ्यासणे.
- अंधश्रध्दा बाधितांच्या माध्यमातून अनुभवास येणाऱ्या समस्या जाणून घेणे.
- अंधश्रध्दा बाधित समस्येचे सधस्थितीचे अवलेकन करणे.

गृहितकृत्ये (Hypothesis)

- लातूर जिल्ह्यातील समाजात अंधश्रद्धा बाधित नागरिक आहेत.
- लातूर जिल्ह्यातील लोकांची आर्थिक, कौटुंबिक परिस्थिती दयनीय आहे.
- अंधश्रध्दाबाधित लोकांमध्ये अज्ञान, धार्मिकता, निरक्षरता मोठ्या प्रमाणात आहे.
- अंधश्रद्धा बाधितात जनजागरणासंबंधी शिक्षण, सेवाभावी संस्था या मधे उदासिनता दिसत आहे.
- समाजात योग्य मार्गदर्शनाअभावी अंधश्रद्धेचे प्रणाम वाढले आहे.

वरील प्रमाणे गृहीतकाची मांडणी संशोधनाच्या उद्दिष्टांना अनुसरून करण्यात आली आहे.

संशोधन पद्धती (Reasearch Methodology)

प्रस्तुत संशोधन समस्या वर्तमान काळाशी निगडित असल्याने संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धत व तथ्य संकलनासाठी प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलन या तंत्राचा समावेश करण्यात येणार आहे. तसेच या संशोधनासाठी संरचनात्मक प्रकार्यवादी सिद्धांताचा वापर करण्यात येईल. प्राथमिक तथ्य संकलन प्रस्तुत शोधनात प्रश्नावली, अनुसूची, मुलाखत, निरीक्षण व सर्वेक्षण तंत्राचा उपयोग करण्यात येणार आहे. दुय्यम तथ्य संकलन वर्तमान पत्र, मासिक, शासकीय अहवाल व दस्तऐवज ग्रंथाचा वापर केला जाईल.

संशोधन आराखडा (Research Design)

संशोधन आराखड्याशिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे अशक्य आहे. म्हणून प्रस्तुत शोध कार्यासाठी निदानात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला जाणार आहे.

<u>नमुना निवड तंत्र</u> (The Sampaling Technique)

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी (Data Collection) सोयीस्कर किंवा सुविधाजनक नमुना निवडी द्वारे 200 एककाची निवड करण्यात येईल. ही निवड करताना अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीच्या अहवालाची ही मदत घेतली जाईल.

<u>वर्गीकरण, विश्लेषण आणि सांकेतिकीकरण</u> (Classification Analysis)

संकलीत केलेली माहिती खुप अस्ताव्यस्त स्वरूपाची असते. आशा माहितीतून संशोधकाला कोणताच निष्कर्ष काढता येणार नाही. म्हणून योग्य निष्कर्ष काढण्यासाठी तथ्याचे वर्गीकरण विश्लेषण व सारणीकरण करावे लागते.

<u>पूर्व संशोधन साहित्याचा आढावा</u>

अंद्धश्रद्धा जागतिक समस्या आहे. अंध्दश्रृध्देबाबत फारसे अध्ययन, संशोधन व लिखाणही फारच कमी प्रमाणात झालेले दिसून येते. या विषया वरील कांही मोजकेच अभ्यास आहेत. त्यापैकी पुढील कांही उपलब्ध अभ्यासाचा अल्लेख करता येइल.

- डॉ.स्वाती पाटील (2015) 'श्रध्दा व अंधश्रध्दा एक अभ्यास' स्वा.रा.ती.म.वि.नांदेड (अप्रकाशित प्रबंध) श्रध्दा व अंधश्रध्दतेला फरक सांगितला आहे.
- नानावटी, प्रभाकर (2016) समग्र अंधश्रध्दा निर्मूलन पुस्तक 11– ?
- बिरादार, सुदर्शन.(2022), समग्र महात्मा बसवेश्वर (चरित्र, कार्य व वचने) या प्रस्तुत ग्रंथात महात्मा बसवेश्वरांनी अंधश्रध्दा बाबतची केलेली मांडणी या स्वारूपाची होती.

मंगल कोठे, अमंगल कोठे संगमनाथा?
दोष कोठे दुरित कोठे संगमनाथा ?
तव स्मरण करणाऱ्यांना भवकर्म कोठे संगमनाथा ?

वरिल ओळीतुन पसरलेल्या अंधश्रध्दा व बुरसटलेल्या गोष्टीला शास्त्र दास्यभाव दूर करणारी त्यांची कळकळ ठळकपणे दिसून येते.

- साळुंखे आ.ह. (2017) संत तुकारामाचे अभंगशतक

देवाची पूजा हे भूताचे पाळण । मत्सर तो सीण बहुतांचा ।। 1।।
रूसावे फुगावे आपुलियावरि । उरला तो हरि सकळ ही ।। 2 ।।

तुका म्हणे संतपण या चि नावे । जरि होय जीव सकळांचा ।। 3 ।।

प्राणिमात्रांचं पालन करणं, हीच देवाची पूजा होय. याउलट, इतरांचा मत्सर करणं, हा आनंद नसून शीणच होय. म्हणजे प्राणी मात्र हेच देव आहेत.

● सागर, के.(2007), महाराष्ट्रातील समाजसुधारक

या प्रस्तुत पुस्तकात महात्मा फुलेनी विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीस सक्रिय पाठिंबा दिला. त्यांनी लेख लिहुन व भाषणे करून विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. तसेच स्वतः पुढाकार घेऊन त्यांनी पुण्याच्या गोखले बागेत 1864 मध्ये एक पुनर्विवाहदेखील घडवून आणला. विधवा स्त्रियांचे केशवपन करण्याच्या दुष्ट प्रथेसही त्यांनी कडाडून विरोध केला.

● सपकाळ,प्र.ना.(1983) संतवणी मधूरा संतवणी चतुरा

पत्थर पूजेसे हर मिले। मै पूजूं एक पहाड ।। 34 ।।

''दगडाच्या पूजनानेच जर देव मिळतो, तर कबीर म्हणतात, मी अंख्खा पर्वतच पूजीन''

● चव्हाण,अनिल(2021) वसा दाभोलकरांचा

प्रस्तुत पुस्तकात सर्वसमान्यात देवधर्माची भीती घालून, चमत्कार दाखवुन, नादी लावणारे, लुबाडणारे बुवाबाबांचे भांडाफोड करून अंधश्रध्दा विरोधात व्यापक काम शाम मानव, डॉ.नरेद्र दाभोलकर यांनी केल्याचे सांगीतले आहे.

संशोधन विषयाचे महत्व (Importance of Research Subject)

या विषयावर बरेच लिखाण झाले असले तरी सदरील संशोधनात विषयानुरूप दुर्लक्षित पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. चिंतन व संशोधनाच्या सहाय्याने जेणेकरून विषयाच्या शास्त्रीय संकलन व स्पष्टीकरण माध्यमातून विषयास न्याय देता येईल. अंद्धश्रद्धा समस्या ही जागतिक स्वरूपाची आहे. तिचे स्वरूप सार्वत्रिक आहे. मानसशास्त्र, समाजशास्त्र व वैद्यकशास्त्र वा इतर विषयात अंद्धश्रद्धाच्या विविध अंगामधे काय आहे याचे संशोधन झाले नाही. भारतात या समस्येने गंभीर रुप धारण केले. अंध्दश्रृध्दा ही कमी शिक्षणामुळे होते. महिला वर्गात ही समस्या मोठया प्रमाणात दिसून येते. भारतीय समाजात शैक्षणिक, आर्थिक दरी मोठया प्रमाणात आहेत. धर्माचा पगडा या लोकांवर मोठया प्रमाणात आहे. अज्ञान, निरक्षरता, विविध आजार मोठया प्रमाणात आहेत. समाजातील अंध्दश्रृध्देमागे कोणते घटक कारणीभूत आहे हे

शोधण्यासाठी हा विषय महत्वाचा ठरतो. अंध्दश्रृध्दा समस्येवर विविध दृष्टिकोनातून वेगवेगळया संषोधकांनी अभ्यास केला असला तरी त्यांच्या संषोधनात काही मुद्दे आले नाहीत. पुर्व संशोधनात सुटलेल्या काही मुदद्याचा या संशोधनात समावेश केला जाणार आहे. विशेष करुन अंध्दश्रृध्देचे प्रमाण जातीनिहाय असे आहे, अंध्दश्रृध्दा प्रगतीला खिळ घालतात हे भारतीय लोकांना लक्षात येत नाही. ही वास्तव स्थिती समाजासमोर आणने व त्यावर उपाय सुचवणे या दृष्टिकोनातून केलेल्या या अभ्यासाला वेगळे महत्व आसणार आहे. विशेषता मराठवाडयातील लातूर जिल्हयातील अंध्दश्रृध्दा बाधित लोकांचे अध्ययन केले गेले नाही. त्यामुळे या संशोधनाला वेगळे महत्व आसणार आहे.

संशोधनाचा मर्यादा व कालावधी (Limitation And Time period of Research)

“लातूर जिल्हयातील अंधश्रृध्दा बाधित लोकांचा एक समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा” या प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलनासाठी निवडयात आला आहे. या संशोधन कार्याचा कालावधी साधारणपणे तीन वर्ष अभिप्रेत आहे.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले

प्रस्तावना

प्रकरण दुसरे

सामाजिक संशोधन पद्धती

प्रकरण तिसरे

वैयक्तिक माहिती

प्रकरण चौथे

उत्तरदात्याची वैयक्तिक व कौटूंबिक पार्श्वभूमी

प्रकरण पाचवे

अंधश्रद्धा बाधित लोकांचे प्रश्न व आरोग्य

प्रकरण सहावे

सारांश व निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ

1) आगलावे, प्रदीप, 2008,सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, साईनाथ प्रकाशन, नागपूर

2) कुलकर्णी, पी.के, 2006, समाजशास्त्रातील सैद्धातिक दृष्टिकोन, मंगेश प्रकाशन, नागपूर

3) गजेंद्रगड, व्ही. एन. व मारुलकर, व्ही. एस. 2000, समकालीन भारतीय समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर,

4) भांडारकर, पु.ल, 1999, सामाजिक संशोधन पद्धती, विद्या बुक्स, औरंगाबाद

5) साळुंखे, सर्वेराव. 1998. समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पूणे

6) धनागरे, द.ना., 1996, विकास प्रक्रिया आणि पर्यावरणाचे प्रश्न समावशाक संशोधनपत्रिका म.स.प अंक 5 वा

7). कांबळे, नारायण. 2021 समाजशास्त्रीय मुलभूत संकल्पना, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

8) कांबळे, नारायण 2012 नवसामाजिक चळवळी, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

9) बिरादार, सुदर्शन 2022 समग्र महात्मा बसवेश्वर (चरित्र, कार्य व वचने), शिवाशिष प्रकाशन,लातूर

10) साळुंखे,आ.ह. 2017 संत तुकारामांचे अभंगशतक, शिवधर्म प्रकाशन, सिंदखेडराजा

11) के.सागर 2007 महाराष्ट्रातील समाजसुधारक के.सागर प्रकाशन, पुणे

12) सपकाळ,प्र.ना.1983 संतवाणी मधुरा संतवाणी चतुरा, इंद्रायणी प्रभाकर सपकाळ,पुणे

13) चव्हाण, अनिल 2021 वसा दाभोलकरांचा, भारती मुद्रणालय, कोल्हापूर

संशोधक
रत्नाकर वसंतराव नळेगावकर
(कनिष्ठ प्राध्यापक)
नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालय,किनगाव
ता.अहमदपूर जि.लातूर

मार्गदर्शक
डॉ.सतीश जी.ससाणे
(सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, समाजशास्त्र विभाग)
महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर जि.लातूर